# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत

# सांगली विभागीय पुरुष व महिला बॉक्सिंग स्पर्धा

# सन २०२२-२३

**-: संयोजक :-**

**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**

**ता. वाळवा, जि. सांगली**

**शिवाजी विद्यापीठअंतर्गत सांगली विभागीय बॉक्सिंग स्पर्धा- सन २०२२-२३**

- **संयोजक – कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**
- **प्राचार्य – डॉ. ए. बी. पाटील मो. नंबर – ९४२३२७१६३६**
- **शारीरिक शिक्षण संचालक – प्रा. अमितराज उत्तमराव माने**
- **मो. नंबर – ७२१९५११७७७**
- **स्पर्धा ठिकाण – सर्जेराव यादव बॉक्सिंग अकॅडेमी इस्लामपूर**
- **स्पर्धा कालावधी- ०२ दिवस (२७,२८ ऑक्टोबर २०२२)**
- **स्पर्धा क्रीडा प्रकार – बॉक्सिंग (पुरुष व महिला)**
- **संयोजन समिती -**

| अ. क्र | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा. प्राचार्य डॉ. ए.बी.पाटील | चेअरमन |
| २ | उपप्राचार्य प्रा. डॉ. एन. एस. शिंदे | सदस्य |
| ३ | उपप्राचार्य प्रा.एस.बी. पाटील | सदस्य |
| ४ | रजिस्टार श्री.अशोक लाड | सदस्य |
| ५ | प्रा.डॉ.एम व्ही गोखले (सीनियर कार्याध्यक्ष) | सदस्य |
| ६ | प्रा.सौ पाडवी(जूनियर कार्याध्यक्ष) | सदस्य |
| ७ | प्रा. सौ.एम.एस.गायकवाड | सदस्य |
| ८ | प्रा. अमितराज उत्तमराव माने | सचिव |
| ९ | प्रा. सचिन जाधव | उपसचिव |
| १० | प्रा. के.आर.ठाकरे | उपसचिव |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. अजित पाटील | प्रशासकीय कर्मचारी |

## -: स्पर्धा अहवाल :-

दि. २७,२८ ऑक्टोंबर २०२२ रोजी इस्लामपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठअंतर्गत सांगली विभागीय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष एन. आर. पाटील (काका) यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. सुनील पाटील, संस्था सदस्य व महात्मा फुले हायस्कूलचे मुख्याद्यापक श्री. अनिल पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष कॉलेजचे उपप्राचार्य डॉ .नितीन शिंदे होते. तर इतर प्रमुख उपस्थितांमध्ये सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे सचिव प्रा. हर्षकुमार पाचोरे, सांगली जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे सचिव मा. शेरखान कुरणे, सर्जेराव यादव बॉक्सिंग अकॅडेमीचे अध्यक्ष मा. सर्जेराव यादव तसेच विविध कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते. उद्घाटनपर भाषणात महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष एन. आर. पाटील (काका) यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्या दिल्या तसेच बॉक्सिंग खेळात भारताचे नाव जगात उंचावणाऱ्या मेरी कोम यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन सर्वांनी सराव करावा असे सांगितले, कार्यक्रमाचे अध्यक्ष कॉलेजचे उप प्राचार्य डॉ .नितीन शिंदे यांनी बॉक्सिंग या खेळास कॉलेज सर्वोतोपरी सहकार्य करील व त्यास संस्थाही मदत करेल असे सांगितले. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक जिमखाना विभागाचे प्रमुख प्रा. अमितराज माने तर आभार प्रा. सचिन जाधव यांनी केले. सदर स्पर्धा या सर्जेराव यादव बॉक्सिंग अकॅडेमी इस्लामपूर येथे घेण्यात आल्या. सदर स्पर्धा एकूण १३ वजन गटात(पुरुष व महिला) घेण्यात आल्या.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ कॉलेजचे उप प्राचार्य डॉ .नितीन शिंदे, सांगली जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे सचिव मा. शेरखान कुरणे, सर्जेराव यादव बॉक्सिंग अकॅडेमीचे अध्यक्ष मा. सर्जेराव यादव, सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे सचिव प्रा .हर्षकुमार पाचोरे यांचे हस्ते झाला. स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू म्हणून प्रथमेश मोरे व स्वलिया मुजावर यांचा गौरव करण्यात आला. या स्पर्धेतून निवड झालेले खेळाडू दिनांक ३१ ऑक्टोबर व १ नोव्हेंबर २०२२ रोजी शहाजी कॉलेज कोल्हापूर येथे होणारया शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय बॉक्सिंग (महिला/पुरुष) स्पर्धेत खेळतील. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कॉलेजचे सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांनी सहकार्य केले. तर जिमखाना विभागाचे प्रा. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे प्रा. सचिन जाधव व अजित पाटील यांनी परिश्रम घेतले.